## निशाणी २१ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा व निशाणी ५ मध्ये दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे.

२. अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणेः–

वादीने प्रस्तुतचा दावा, दावा कलम १अ ते १फ या मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून व कब्जासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे व निशाणी ५ नुसार प्रतिवादी क्र. १ व २ चे विरुद्ध तुर्तातुर्त मनाईची मागणी केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे हजर झाले व त्यांनी निशाणी ५ चे अर्जास म्हणणे देवून, त्यातील परिच्छेद क्र. ड मध्ये मौजे बळेगांव येथील मिळकत समाविष्ट केली नाही. तसेच मौजे वराळे, अकलूज, मानीवली व आंबी येथील मिळकतींबाबत नमूद केलेले आहे. त्यामुळे त्या मिळकतीं संदर्भाने दाव्यात व निशाणी ५ मध्ये दुरुस्ती होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही प्रतिवादीने त्याचे म्हणण्यात तक्रार केल्याने करणे भाग पडत आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही व प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही व शेवटी त्यांनी अर्ज विनंतीनुसार मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी २७ कडे दाखल करुन, वादीचा अर्ज अमान्य केला. वादीने स्वतःच्या नावे असलेल्या एकत्र कुटुंबाच्या

मिळकती न्यायालयापासून लपवून ठेवून, दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे जाणुनबुजून केलेली चुक दुरुस्त करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे व ते न्यायालयाची दिशाभूल करीत आहेत. त्यांनी त्यांची कैफियत व प्रतिदावा दाखल केलेला आहे व तसा बचाव देखील त्यांनी घेतलेला आहे. त्यामुळे अशाप्रकारची दुरुस्ती वादीस मागता येणार नाही. तसेच वादीने ताकीद अर्जात दुरुस्ती मागितली आहे. तथापी, वादीला दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्याचे प्लीडींगमध्ये दुरुस्ती मागता येते. अंतरिम अर्जामध्ये दुरुस्ती मागणेबाबत दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये तरतूद नाही, याची कल्पना असताना देखील न्यायालयाची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने तशी दुरुस्ती वादीने मागितली आहे, ती मंजूर करता येणार नाही.

४. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, त्यांनी प्रतिदावा दाखल केला असून, त्यामध्ये सदरच्या मिळकतीं नमूद करुन, त्या एकत्र कुटुंबाच्या मिळकतीं आहेत असे हक्कज्ञापन मागितले आहे. वादीने अर्जामध्ये नमूद केलेल्या मिळकती स्वःकष्टार्जीत आहे असे नमूद केले आहे. सदर मिळकतींबाबत प्रतिदाव्यामध्ये त्यांनी मागणी केली असल्याने, सदरची दुरुस्ती आवश्यक नाही. त्याबाबत वादी पुरावा देवू शकतात व कैफियत देखील दाखल करु शकतात. त्यामुळे सदरची दुरुस्ती ही अनावश्यक आहे व ती मंजूर केल्यास, दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये बदल होणार आहे व शेवटी त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

५. अर्ज वाचला, त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे पाहिले, अभिलेख अवलोकीला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द सरस निरस मानाने वाटपासाठी, स्वतंत्र कब्जासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी हजर होवून त्यांचे लेखी म्हणणे देवून, वादीने दाव्यात कुटुंबाच्या सर्व मिळकतीं समाविष्ट केल्या नाहीत असा आक्षेप घेतलेला आहे व तो दूर करण्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

६. वादीचे विद्वान विधिज्ञ श्री. आर. एस. वाघमोडे यांनी युक्तिवाद केला की, प्रतिवादींनी आक्षेप घेतल्यामुळे त्यांना तशी दुरुस्ती करावी लागत आहे व सदरची दुरुस्ती ही उभयपक्षकारांमधील वाद कायमस्वरुपी निर्गत होण्यासाठी आवश्यक आहे. तर, अर्ज निशाणी ५ मधील दुरुस्ती दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५३ नुसार करता येवू शकते.

७. याउलट, प्रतिवादींचे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एस. निंबाळकर यांनी युक्तिवाद केला की, दाव्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दुरुस्ती मागता येणार नाही. प्रतिवादींनी सर्व मिळकतीं समाविष्ट केल्या नाहीत हा बचाव घेतलेला असल्याने, तशी दुरुस्ती वादीला मागता येणार नाही. त्यांनी प्रतिदावा दाखल केला आहे. त्यामध्ये सदर बाबीं स्पष्ट होणार आहेत. त्यासाठी देखील दुरुस्तीची आवश्यकता नाही. दुरुस्ती मंजूर केल्यास, दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे. तसेच, निशाणी ५ मध्ये

दुरुस्तीची दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये तरतूद नाही व शेवटी त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

८. प्रस्तुत दावा वाटपाचा असल्याने संपूर्ण कुटुंबाच्या मिळकतीं दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. प्रतिवादींनी दाखल केलेल्या म्हणण्यामुळे वादीस दाव्यात समाविष्ट न केलेल्या मिळकतीं दाव्यामध्ये नमूद करण्यासाठी व त्या संदर्भाने स्पष्टीकरण देण्यासाठी दुरुस्ती करावी लागत आहे व सदरची दुरुस्ती ही नैसर्गिक अशीच आहे. त्यामुळे प्रतिवादींनी त्यांचा तो बचाव आहे त्यामुळे ती दुरुस्ती देता येणार नाही, या त्यांच्या युक्तिवादामध्ये तथ्य असल्याचे दिसत नाही. सदरची दुरुस्ती ही वादी, प्रतिवादीं मधील वादाचे निरासरण करण्यासाठी व भविष्यातील प्रकरणाचे गुणारीकरण टाळण्यासाठी आवश्यक आहे. तसेच, दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होईल अगर प्रतिवादींचा हक्क भंग होईल असे नाही.

९. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने निशाणी ५ कडील अर्जात देखील दुरुस्ती मागितली आहे. त्याअनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ चे अवलोकन केले असता, वादकथन म्हणजे वादपत्र किंवा लेखी म्हणणे (कैफियत) असे नमूद केले आहे. तर, सदर आदेशाच्या नियम १७ मध्ये केवळ वादकथनामध्ये दुरुस्ती करता येते असे नमूद केले आहे. सबब, वादीने मागितलेली अर्ज निशाणी ५ मधील दुरुस्ती मंजूर करणे योग्य होणार नाही. तथापि, त्यास दिवाणी प्रक्रिया संहितेचा कलम १४१

नुसार सदरचा लाभ देता येवू शकतो. सबब, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, आदेश.

## आदेश

१. अर्ज विनंतीनुसार मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरची दुरुस्ती प्रस्तुत आदेशाचे दिनांकापासून १४ दिवसाचे आत करावी व दाव्याची व अर्जाची दुरुस्त प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी सादर करावी.

Ratnakar Sudhakar Kshirsagar
Digitally signed by Ratnakar Sudhakar Kshirsagar
Date: 2020.11.12 09:50:02 +0530

माळशिरस.		**(र. सु. क्षीरसागर)**

दि. ११/११/२०२०.		दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माळशिरस.

## <u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | **N. N. Konda, Grade-II** |
| (b) | Court | : | **Civil Court Senior Division, Malshiras.** |
| (c) | Judgment signed by P.O. on | : | **11.11.2020.** |
| (d) | Judgment uploaded on | : | **11.11.2020.** |